**<u>फौजदारी अपिल क्रमांक ५३/२०२२</u>**

**MHSN04-001093-2022**

श्री.चंद्रशेखर ऊर्फ योगेश भिमराव हेरवाडे, वगैरे ३ ... अपेलंट

**<u>विरुध्द</u>**

सौ. स्वाती चंद्रशेखर ऊर्फ योगेश भिमराव हेरवाडे, वगैरे ३ ... जाबदार

**<u>नि.५ वरील आदेश</u>**

अपिलार्थी यांनी प्रस्तुतचा अर्ज न्यायचौकशी न्यायालयाने दिनांक ११/१०/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशांविरुध्द स्थगिती मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. जाबदार यांनी सदर अर्जावर खुलासा सादर करुन विरोध दर्शविला आहे.

०२. अपिलार्थी, तसेच जाबदार यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अपिलाथीर्च्या युक्तिवादानुसार जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २९ अंतर्गत च्या कलम २३ नुसार दरमहा रु.२०,०००/- पोटगी मिळण्याकरीता व वास्तव्यासह इतर संरक्षण आदेशांकरीता अर्ज दाखल केला होता व न्यायालयाने जाबदार क्र.१ यांना दरमहा रु.३,५००/- व जाबदार क्र.२ यांना दरमहा रुपये ३,०००/- पोटगीचे, तसेच अपिलार्थी यांनी जाबदार यांना त्यांच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.१३९, कसबा सागांव, ता.कागल येथे एकत्र राहत असलेल्या घरातील खालील तीन रुम देणेत यावे, तसेच नुकसान भरपाई पोटी रक्कम रुपये २०,०००/- जाबदारांना देण्याचे आदेश दिले आहेत. सदरचे आदेश या न्यायालयापढे आव्हानित करण्यात आले आहेत.

०४. अपिलार्थीच्या वि. वकीलांनी अर्जात नमुद मजकुरानुसार युक्तिवाद सादर केला. या व्यतिरिक्त त्यांनी असे कथन केले की, न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेल्या वास्तव्याच्या आदेशाविरुध्द स्थगिती न दिल्यास त्यांना आक्षेप नाही. मात्र जाबदार यांना मंजुर केलेल्या पोटगीचे आदेश या संदर्भात त्यांचा निषेध आहे. अपिलार्थी क्र.१ यास दरमहा रुपये ११,०००/- इतका पगार असून, त्यापैकी पोटगीकरीता दरमहा दोन्ही जाबदारांना मिळुन रुपये ६,५००/- एवढी आदेशीत केलेली रक्कम ही गैरवाजवी आहे. याशिवाय अपिलार्थी क्र.१ हे सोलापूर येथे नाकरी करत असून, त्याला तिथे दरमहा घरभाडेपोटी तसेच जेवणाकरीता सुमारे रु.५,०००/- खर्च करावे लागतात. त्यामुळे आदेशीत केलेली पोटगीची रक्कम अवास्तव असून अपिलार्थी क्र.१ यांना भरणे अशक्य आहे. अशा स्थितीत अपिलार्थी क्र.१ यांच्या घरात वास्तव्यासंबंधीत जाबदाराच्या पक्षात झालेले वास्तव्य आदेश जैसे-थे ठेवून केवळ पोटगीचे आदेश स्थगित ठेवण्याची विनंती त्यांच्याकडून करण्यात आली.

०५. जाबदारांच्या (मुळ अर्जदार) यांच्या म्हणण्यानुसार, सदर कामी न्यायचौकशी न्यायालयाने दिनांक १२/१०/२०२२ रोजी आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे अपिलार्थी क्र.१ हे जाबदार यांना रक्कम रुपये ३,७७,०००/- इतकी रक्कम देणे आहे. त्याच प्रमाणे दरम्यानच्या पोटगीमध्ये रक्कम रुपये १,४६,०००/- इतकी रक्कम देय आहे. अशा स्थितीत अपिलार्थी क्र.१ याने सदर थकीत रकमेपैकी निम्मी रक्कम भरणे अपेक्षीत आहे. तसेच जाबदार हे न्याय चौकशी न्यायालयाचे आदेशाप्रमाणे अपिलार्थी क्र.१ यांचे मिळकतीमध्ये राहत आहेत. त्यामुळे सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचा स्थगितीचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

०६.   याशिवाय उभय पक्षांच्या कथनामधुन हेही ध्वनित झाले की, उभय पक्षांचे कौटुंबिक प्रकरण कौटुंबिक न्यायालयातही प्रलंबित असुन तेथेही अपिलार्थीस जाबदाराला पोटगी देण्याचे आदेश झाले आहेत. या प्रकरणातील पोटगीचे आदेश सदर न्यायालयाच्या निदर्शनास आणल्यानंतर पोटगीचे आदेश झाले आहेत. तेंव्हा ते उभयपक्षांचे उत्पन्न व गरजा या अनुशंगानेच या प्रकरणातील आदेशांना पुरक म्हणून झाले असतील असे दिसते. सदर प्रकरणात पोटगी भरली जात नाही असे जाबदारांचे कथन नाही. त्यामुळे सद्यःस्थितीत तरी प्रस्तुत अपिल निर्णित होवेपावेतो जाबदाराजवळ मर्यादीत असले तरी अपिलार्थीकडुन उत्पन्न मिळणार असे दिसते.

०७.   निश्चीतच अपिलार्थी व जाबदार यांची कथने, कागदपत्रे व न्यायचौकशी न्यायालयाचा वादातित आदेश यांच्या अवलोकनानंतर प्रस्तुतचे अपिल गुणवत्तेवर निर्णीत करण्यात येणार आहे. सद्यःस्थितीत दोनही पक्षांच्या परस्पर विरोधी कथनांचा गुणवत्तेवर विचार करण्यापेक्षा उभय पक्षांना कौटुंबिक कलह न करता अपिल निर्णीत होईपर्यंत योग्य पध्दतीने राहता येईल याचा विचार करुन सदर अर्जावर आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून उभय पक्षांच्या गुणवत्तेवरील कथनांच्या आधारे हा आदेश पारित करण्यात आलेला नाही.

०८.   वाद कथनांचे वाचन केले असता असे दिसुन येते की, जाबदार क्र.१ ही अपिलार्थी क्र.१ ची पत्नी आहे. त्यामुळे अपिलार्थी क्र.१ याची जाबदार यांना सांभाळण्याची नैतीक जबाबदारी आहे. जाबदार क्र.१ हिच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही व तिच्यावर लहान मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे. तसेच अपिलार्थी क्र.१ याचेकडे मर्यादीत असले तरी उत्पन्नाचे साधन आहे. शिवाय जाबदार क्र.१ कडेही कौटुंबिक न्यायालयाने मंजुर केलेली पोटगी आहे. अशा वेळी उभय पक्षांची वास्तव्याची सद्यःस्थितीतील व्यवस्था न मोडता अपिल अंतिमतेने निर्णीत होईपावेतो, न्याय चौकशी न्यायालयाने दिनांक

१२/१०/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशातील क्र.३ वर देण्यात आलेल्या एकुण पोटगीच्या रकमेपैकी निम्मी रक्कम देण्यासंबंधी आदेश पारित करुन केवळ पोटगीचे आदेश पुढील काळाकरीता स्थगित करणे न्याय्य होईल. म्हणून केवळ पोटगीच्या आदेशांपुरते मर्यादीत स्थगन आदेश वर नमुद अटीच्या आधिन राहुन केल्यास न्यायोचित होईल असे अनुमान मी काढले.

०९. एकंदरित परिस्थितीचा विचार करता वर नमुद मजकुराच्या अनुशंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. न्यायचौकशी न्यायालयाच्या दि.१२/१०/२०२२ रोजीच्या वादातित आदेशांतील क्रमांक ३ चे पोटगी संदर्भातील आदेशांवर खालील अटीस अधीन राहुन प्रस्तुतचे अपिल अंतिमतेने निर्णय पावेतो स्थगनादेश देण्यात येत आहेत –

**अ.** अपिलार्थीनी वादातित आदेशातील इतर संरक्षण आदेशांचे कायदेशीररित्या पालन करावे.

**ब.** अपिलार्थी यांनी न्याय चौकशी न्यायालयाने क्र.३ वर आदेशीत केलेल्या एकुण पोटगीच्या रकमेपैकी प्रस्तुत आदेश होईपावेतो थकीत असलेल्या रकमेच्या अर्धी रक्कम या आदेशापासून ३० दिवसांच्या कालावधीत जाबदार यांना देण्याची आहे.

**क.** प्रस्तुत अपिल जलद गतीने चालविणेत यावे.

ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR

Digitally signed by ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR
Date: 2024.08.29 17:40:25 +0530

दि.१४/०८/२०२४ (श्रीमती ए. एच. काशीकर),

तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१ व अति. सत्र न्यायाधीश–१,

इस्लामपूर.